# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक १५/०६/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक १५/०६/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या आरोग्य व बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | आरोग्य विभाग |
| १ | १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकीचे कामास २०२३-२०२४ करिता दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ जुलै २०२३ पर्यंत सन २०२१-२०२२ चे कंत्राटदारास मुदत वाढ देणेबाबत. |
| २ | १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२३-२०२४ करिता दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ जुलै २०२३ पर्यंत सन २०२१-२०२२ चे कंत्राटदारास मुदत वाढ देणेबाबत. |
| | बांधकाम विभाग |
| ३ | १५ वित्त आयोग योजने अंतर्गत मालपाणी यांचे घरापासून ते बाहेती यांचे घरापर्यंत रस्ता व नाली बांधकाम करून लोखंडी चेंबर बसवणे च्या कामास मुदतवाढ मिळणे बाबत. |
| ४ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र. क्र. १४ मधील दत्तनगर मध्ये सोनाजी खर्चे यांच्या घरापासून ते न.प. जॅकवेल पर्यंत पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दोन्ही बाजूने नाली बांधकाम करणे च्या कामास मुदतवाढ मिळणे बाबत |
| ५ | नगरोत्थान योजने अंतर्गत प्र. क्र. १४ मधील दत्तनगर मध्ये खराटे यांचे घरापासून ते डॉ. गांधी यांचे घरापर्यंत दोन्ही बाजूस नाली बांधकाम करण्याच्या कामास मुदतवाढ मिळणे बाबत |
| ६ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्र. क्र. ९ मध्ये रमाई नगर रोड पासून ते पांडुरंग गवळी ते सालीपुरा नाक्यापर्यंत ढाप्यासह नाली बांधकाम करण्याच्या कामास मुदतवाढ मिळणे बाबत |

---

**विषय क्र.१ :- १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा संकलन व वाहतुकीचे कामास २०२३-२०२४ करिता दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ जुलै २०२३ पर्यंत सन २०२१-२०२२ चे कंत्राटदारास मुदत वाढ देणेबाबत.**

घनकचरा संकलनाचे कामाकरिता सन २०२३-२०२४साठीचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना पाठविण्यात आले आहे. यापूर्वी दि. ०२/०९/२०२२ रोजी सन २०२२-२०२३ करिता सदर कामाचे नवीन कामाचे अंदाजपत्रकास १५ व्या वित्त आयोग निधीतून प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडे दि. ०२/०९/२०२२ रोजी सादर करण्यात आला होता परंतु प्रस्तावाच्या किमती इतका निधी १५ व्या वित्त आयोग निधी मध्ये उपलब्ध नसल्याने सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नाही. तसेच विहित

मुदतीमध्ये निविदा प्रक्रिया न झाल्यामुळे सन २०२१-२०२२ चे कंत्राटदारास वेळोवेळी देण्यात आलेल्या मुदतवाढीच्या प्रशासकीय मान्यतांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुदतवाढीचा कालावधी | प्रशासकीय मान्यता आदेश | मान्यता देणारे प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३०/०६/२०२२ | जा. क्र. १२६९/नाविशा/डेक्स-२/२०२२ दि. २०/०६/२०२२ | मा. जिल्हाधिकारी महोदय |
| २ | दि. ०१/०७/२०२२ ते दि. ३१/०८/२०२२ | जा. क्र. १८७६/नाविशा/डेक्स-२/२०२२ दि. ०७/०९/२०२२ | मा. जिल्हाधिकारी महोदय |
| ३ | दि. ०१/०९/२०२२ ते दि. ३०/०९/२०२२ | जा. क्र. मनप/३८६२/२०२२ दि. २३/०९/२०२ | मुख्याधिकारी न.प. मलकापूर |
| ४ | दि. ०१/१०/२०२२ ते दि. ३१/१०/२०२२ | जा. क्र. मनप/४१८८/२०२२ दि. १९/१०/२०२ | मुख्याधिकारी न.प. मलकापूर |
| ५ | दि. ०१/११/२०२२ ते दि. ३०/११/२०२२ | जा. क्र. मनप/४३७२/२०२२ दि. १७/११/२०२ | मुख्याधिकारी न.प. मलकापूर |

तरी, १५ व्या वित्त आयोग निधीद्वारे प्राप्त होणारे अनुदान वेळेत न मिळाल्यामुळे व प्राप्त होणारा निधी पुढील कामाची प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी अपुरा असल्याने प्रशासकीय मान्यता मिळाल्या नाहीत. करिता, सद्यस्थितीत १५ व्या वित्त आयोग बंधनकारक अनुदान अंतर्गत पिण्याचे पाणी व घनकचरा व्यवस्थापन करिता एकूण प्राप्त निधीतून माहे डिसेंबर २०२२ ते जुलै २०२३ पर्यंत एकुण ८ महिन्यांची प्रशासकीय मान्यता घ्यावी लागले व १ ऑगस्ट २०२३ पासून पुढील कामासाठी काटकसरीचे अंदाजपत्रक तयार केले असून त्यासाठी तत्काळ नवीन निविदा प्रक्रिया करणे प्रस्तावित आहे, जेणेकरून पुढील प्राप्त अनुदानातून सदर खर्च करणे शक्य होईल व अनुदान प्राप्त न झाल्यास न.प. निधीतून देयक प्रदान करावयाचे झाल्यास ते प्रदान करणे शक्य होईल.

तरी,वरील सर्व कारणांमुळे निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याकारणाने तसेच सदर काम सुरू ठेवणे, शहरात स्वच्छता ठेवणे अत्यावश्यक असल्यामुळे नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत असे वेळोवेळी २ -२ महिन्यांची मुदतवाढ देणे गरजेचे होते व त्यानुसार मा. सभेच्या कार्योत्तर मंजुरातीस अधीन राहून सदर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. करिता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च 15व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागेल. त्यानुसार सदर कामाचे सन 2021-22चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राइजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तींना अधीन राहून दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ जुलै २०२३ पर्यंत एकूण चार महिनेदेण्यात आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यास हि सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र. २ :- १५ व्या वित्त आयोग निधी अंतर्गत घनकचरा प्रक्रियेचे कामास २०२३-२०२४ करिता दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ जुलै २०२३ पर्यंत सन २०२१-२०२२ चे कंत्राटदारास मुदत वाढ देणेबाबत.**

घनकचरा संकलनाचे कामाकरिता सन २०२३-२०२४साठीचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना पाठविण्यात आले आहे. यापूर्वी दि. ०२/०९/२०२२ रोजी सन २०२२-२०२३ करिता सदर

कामाचे नवीन कामाचे अंदाजपत्रकास १५ व्या वित्त आयोग निधीतून प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडे दि. ०२/०९/२०२२ रोजी सादर करण्यात आला होता परंतु प्रस्तावाच्या किमती इतका निधी १५ व्या वित्त आयोग निधी मध्ये उपलब्ध नसल्याने सदर प्रस्तावास मान्यता मिळाली नाही. तसेच विहित मुदतीमध्ये निविदा प्रक्रिया न झाल्यामुळे सन २०२१-२०२२ चे कंत्राटदारास वेळोवेळीमुदतवाढ देण्यात आली आहे. तरी, १५ व्या वित्त आयोग निधीद्वारे प्राप्त होणारे अनुदान वेळेत न मिळाल्यामुळे व प्राप्त होणारा निधी पुढील कामाची प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी अपुरा असल्याने प्रशासकीय मान्यता मिळाल्या नाहीत. करिता, सद्यस्थितीत १५ व्या वित्त आयोग बंधनकारक अनुदान अंतर्गत पिण्याचे पाणी व घनकचरा व्यवस्थापन करिता एकूण प्राप्त निधीतून माहे डिसेंबर २०२२ ते जुलै २०२३ पर्यंत एकूण ८ महिन्यांची प्रशासकीय मान्यता घ्यावी लागले व १ ऑगस्ट २०२३ पासून पुढील कामासाठी काटकसरीचे अंदाजपत्रक तयार केले असून त्यासाठी तत्काळ नवीन निविदा प्रक्रिया करणे प्रस्तावित आहे, जेणेकरून पुढील प्राप्त अनुदानातून सदर खर्च करणे शक्य होईल व अनुदान प्राप्त न झाल्यास न.प. निधीतून देयक प्रदान करावयाचे झाल्यास ते प्रदान करणे शक्य होईल.

तरी, वरील सर्व कारणांमुळे निविदा प्रक्रिया प्रलंबित असल्याकारणाने तसेच सदर काम सुरू ठेवणे,कचऱ्यावर प्रक्रिया करणेआवश्यक असल्याने नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश होईपर्यंत असे वेळोवेळी २ -२ महिन्यांची मुदतवाढ देणे गरजेचे होते व त्यानुसार मा. सभेच्या कार्योत्तर मंजुरातीस अधीन राहून सदर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. करिता सदर मुदतवाढ देऊन सदर मुदतवाढीच्या कालावधीतील या कामाचा खर्च 15व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागेल. त्यानुसार सदर कामाचे सन 2021-22चे कंत्राटदार सृष्टी एंटरप्राइजेस, गंगापूर यांना मूळ करारनाम्यातील अटी शर्तींना अधीन राहून दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ जुलै २०२३ पर्यंत एकूण चार महिने देण्यात आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यास हि सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र.३ :- १५ वित्त आयोग योजने अंतर्गत मालपाणी यांचे घरापासून ते बाहेती यांचे घरापर्यंत रस्ता व नाली बांधकाम करून लोखंडी चेंबर बसवणे च्या कामास मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मो. जाहेद अ. सलाम शेख यांना १५ वित्त आयोग योजनेअंतर्गत मालपाणी यांचे घरापासून ते बाहेती यांचे घरापर्यंत रस्ता व नाली बांधकाम करून लोखंडी चेंबर बसवणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश जा.क्र. नपम/मुअ/बांध/१०१६/२०२२ दिनांक ०४/०५/२०२२ रोजी त्यांच्या नावाने देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने होता परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास ६ महिने मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे काम करणे महत्त्वाचे असल्यामुळे सदर कामास ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.४ :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र. क्र. १४ मधील दत्तनगर मध्ये सोनाजी खर्चे यांच्या घरापासून ते न.प. जॅकवेल पर्यंत पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दोन्ही बाजूने नाली बांधकाम करणे च्या कामास मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार काद्री ख्वाजा वाजीदउल्ला यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र. क्र. १४ मधील दत्तनगर मध्ये सोनाजी खर्चे यांच्या घरापासून ते न.प. जॅकवेल पर्यंत पेव्हिंग ब्लॉक बसविणे व दोन्ही बाजूने नाली बांधकाम करणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश जा.क्र. नपम/मुअ/बांध/२०७५/२०२१ दिनांक ०३/०९२०२१ रोजी त्यांच्या नावाने देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने होता परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास ६ महिने मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे काम करणे महत्त्वाचे असल्यामुळे सदर कामास ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.५ :- नगरोत्थान योजने अंतर्गत प्र. क्र. १४ मधील दत्तनगर मध्ये खराटे यांचे घरापासून ते डॉ. गांधी यांचे घरापर्यंत दोन्ही बाजूस नाली बांधकाम करण्याच्या कामास मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार काद्री ख्वाजा वाजीदउल्ला यांना नगरोत्थान योजने अंतर्गत प्र. क्र. १४ मधील दत्तनगर मध्ये खराटे यांचे घरापासून ते डॉ. गांधी यांचे घरापर्यंत दोन्ही बाजूस नाली बांधकाम करणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश जा.क्र. नपम/मुअ/बांध/२६२/२०२२ दिनांक ०२/०२/२०२२ रोजी त्यांच्या नावाने देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने होता परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास ६ महिने मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे काम करणे महत्त्वाचे असल्यामुळे सदर कामास ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.६ :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत प्र. क्र. ९ मध्ये रमाई नगर रोड पासून ते पांडुरंग गवळी ते सालीपुरा नाक्यापर्यंत ढाप्यासह नाली बांधकाम करण्याच्या कामास मुदतवाढ मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेला अहवालानुसार मो. जाहेद अ. सलाम शेख यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र. क्र. १४ मधील दत्तनगर मध्ये खराटे यांचे घरापासून ते डॉ. गांधी यांचे घरापर्यंत दोन्ही बाजूस नाली बांधकाम करणे या कामासंदर्भात कार्यारंभ आदेश जा.क्र. नपम/मुअ/बांध/८०१/२०२२ दिनांक ०१/०४/२०२२ रोजी त्यांच्या नावाने देण्यात आला होता. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ६ महिने होता परंतु, मुदतीत काम पूर्ण न झाल्यामुळे वरील कामास ६ महिने मुदतवाढ मिळण्याबाबत त्यांनी विनंती केली आहे. त्यानुसार सदरचे काम करणे महत्त्वाचे असल्यामुळे सदर कामास ६ महिन्याची मुदत वाढ देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**